# जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया

क्रमांक: जिसकवि/जिपगो/दिव्यांग/जिदिपुके/......../२०२२-२३, दि. ......११.२०२२

## जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, गोंदिया

## हस्तांतरण जाहिरात

दिव्यांग व्यक्ति हक्क अधिनियम, २०१६ या कायद्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी तसेच सर्व २१ प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात टिकवुन ठेवण्यासाठी गरजेनुसार पुनर्वसनात्मक सहायभुत सेवा विहित कालावधी मिळण्याकरिता दिव्यांग सक्षमीकरण विभाग, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकारच्या Scheme for Implementation of Rights of Persons with Disabilities Act, 2016 (SIPDA) योजने अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींकरीता शासन मान्य 'जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र' असून, या पुनर्वसन केंद्रामार्फत दिव्यांग व्यक्तींना विविध सोयी, सुविधा आणि साहित्य साधने वितरण इत्यादी विविध पुनर्वसनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करणे अभिप्रेत आहे.

सदर 'जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र चालविण्यासाठी खाली दिलेल्या कार्याच्या आवश्यक असलेल्या अटी व शर्ती पूर्ण करू शकणाऱ्या संस्थानी अर्ज दि. 05/12/2022 रोजी सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावेत. सदर केंद्राच्या हस्तांतरण तपशीलवार अटी व शर्ती, जाहिरात स्वरूप आणि कामाची व्याप्ती याची संपूर्णमाहिती http://zpgondia.gov.in/ या वेबसाइट वरून पाहता येईल.

-Sd-

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंधाधिकारी
जिल्हा गोंदिया

Scanned by CamScanner

# जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया

क्रमांक: जिसकवि/जिपगो/दिव्यांग/जिदिपुके/......../२०२२-२३, दि. ......११.२०२२

## जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, गोंदिया

## हस्तांतरण जाहिरात

**जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांच्या वतीने 'जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र' चालविण्यासंदर्भात नामांकित नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था/ अशासकीय संस्था यांचेकडून अर्ज करण्याबाबतचे निर्देश :**

१) स्वयंसेवी संस्था हि संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणीकृत असावी.

२) संस्थेच्या कार्यकारनीमध्ये कोणताही वाद धर्मादाय आयुक्त कार्यालयात नसावा.

३) संस्थेकडे दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ कायद्यातील कलम ५० व ५१ नुसार दिव्यांग क्षेत्रात पुनर्वसन विषयक काम करण्यासाठी आवश्यक असलेले नोंदणी (अनुज्ञाप्ति) (वैध) प्रमाणपत्र असावे. (मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांचेकडे)

४) संस्थेच्या ध्येय आणि उद्दीष्टामध्ये संस्था दिव्यांग पुनर्वसन क्षेत्रात कार्य करण्याबाबत स्पष्ट उल्लेख असावा.

५) संस्थेने यापूर्वी दिव्यांग कल्याणविषयक कार्यक्रम, कैंप आयोजित केल्याचे किमान ३ वर्षाचा अनुभव असावा. (कार्यक्रम आयोजित केल्याचे पुरावे जसे, फोटो, पेपर कात्रने, व्हिडिओ लिंक इत्यादी सोबत जोडावे.

६) एक चांगले ट्रॅक रेकॉर्ड असलेले एक प्रतिष्ठित नोंदणीकृत संस्था जे त्याच्या प्रारंभापासून थेट व्यवस्थापन करण्यास सक्षम असेल त्यांनीच सदर केंद्र चालविण्यासाठी अर्ज सादर करावा.

७) संस्था ही व्यवस्थित प्रस्थापित असून व्यावसायिक कार्यक्रम संयोजक करण्यास सक्षम असावी आणि त्यांचा या क्षेत्रातील कार्याचा अनुभव असावा तसेच शासनाच्या किंवा सार्वजनिक क्षेत्रातील कार्यक्रमांचे किंवा उपक्रमाचे यशस्वी आयोजन केलेले असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

८) संस्था दिव्यांग क्षेत्रात अधिक सक्रिय भूमिका बजावणारी असल्यास तसेच प्रभावीपणे विविध दिव्यांग पुनर्वसन उपक्रमांचे प्रभावी कार्य करण्यासाठी शासनाच्या मानदंड आणि इतर आवश्यकतांची पूर्तताकेलेली असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

९) संस्थेने मागील ३ वर्षाचे वार्षिक कार्य अहवाल (Annual Reports) सादर करावा ज्यामध्ये दिव्यांग

Scanned by CamScanner

पुनर्वसन क्षेत्रात कार्य केल्याचा उल्लेख असावा.

१०) संस्थेच्या कार्यकारी मंडळात संस्थेतील पदाधिकारी व सदस्य दिव्यांगांच्या विविध क्षेत्रातील आर.सी.आय. नोंदणीकृत तज्ञ व्यक्ति किंवा दिव्यांग व्यक्ति असल्यास, त्या संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.

११) संस्थेच्या वतीने किंवा संस्थेतील पदाधिकारी व सदस्य यांना इतर ठिकाणी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र' चालविण्याचा अनुभव असल्यास, त्या संस्थेस असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

१२) संस्थेच्या अर्जासोबत खालील गोष्टीचा समावेश असावा :

a) संस्था नोंदणी तथा संस्थेचे दिव्यांग पुनर्वसन क्षेत्रात कार्य करण्याचे प्रमाणपत्र

b) संस्थेच्या वतीने अटी व शर्तींची स्वीकृती / संमतीचे अधिकृत स्वाक्षरीसह प्रमाणपत्र. (संस्थेच्या लेटर-हेड वर)

c) कोणत्याही सरकारी एजन्सीने फर्म / कंपनीच्या काळ्या यादीमध्ये ठेवलेले नाही, असे हमिपत्र (रु. १००/- च्या स्टंप पेपरवर).

d) अर्जात नमूद केलेले सर्व नियम व शर्ती त्यांनी वाचल्या आहेत आणि समजून घेतल्या आहेत आणि अशा अटी व शर्तीनुसार केंद्र चालविण्यास इच्छुक असल्याचे प्रमाणपत्र.

e) अर्ज सादर करतांना संस्थेचे आयकर प्रमाणपत्र किंवा पॅनकार्ड, व्हॅट / जी.एस.टी. प्रमाणपत्र याची खरी प्रत संलग्न करावी.

f) या अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्र खरी असल्याबाबतचे हमीपत्र/ प्रतिज्ञापत्र.

g) संस्थेचा कार्य अहवाल (ॲनुअल रिपोर्ट) आणि वार्षिक उलाढालीचा लेखापरिक्षण अहवाल (ऑडिट रिपोर्ट) पुरावा;

१३) सदर केंद्र चालविण्यासाठी अर्ज सादर करताना अर्जदारांनी सस्थेची ओळखपत्रे, आयोजित केलेल्या प्रकल्पांची यादी, प्रशंसापत्रे, संस्था नोंदणी प्रमाणपत्र आणि वैधानिक कर नोंदणी इत्यादींच्या समर्थनार्थ योग्य कागदपत्रे तसेच शासकीय, निम-शासकीय किंवा इतर कोणत्याही नामांकित संस्थांमध्ये यशस्वीरीत्या केलेल्या अशा प्रकारच्या कामाबद्दल अर्जदारांचे भूतकाळातील अनुभव प्रमाणपत्र सादरकेले जावे.

१४) सदर जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रकरिता आवश्यक असलेला निधि/ अनुदान हा टप्प्या-टप्प्याने कार्याची समाधानकारक स्थिति आणि कामगिरी बघून दिव्यांग सक्षमीकरण विभाग, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून देण्यात येतो, त्यामुळे संस्था शासनाच्या अनुदानाशिवाय स्वबळावर चालविण्यास समर्थ असल्याचे लेखी हमीपत्र (रु. १००/- च्या स्टंप पेपरवर) सादर करावे.

१५) जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राद्वारा जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना देण्यात येणा-या कार्याचा आणि

Scanned by CamScanner

सेवांचा दर्जा हा चांगल्या प्रतीचा असावा.

१६) संस्थेची निवड झाल्यास अर्जदारानी प्रकल्पाची प्रक्रिया आणि कार्यपद्धती याविषयी सविस्तर प्रस्ताव दिव्यांग सक्षमीकरण विभाग, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे सादर करावा, त्यामध्ये आवश्यक असणारी विविध तांत्रिक साहित्य, साधने आणि मनुष्यबळाचा तपशीलवार उल्लेख असावा.

१७) ज्या संस्थेची या जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र चालविण्यासाठी निवडीची प्रक्रिया पार पाडल्यानंतर व त्यास सक्षम अधिका-याची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर संस्थेने कार्यादेश निर्गमित केल्याच्या २१ दिवसाच्या आत सदर केंद्राला सुरुवात करावी लागेल.

१८) कार्यान्वयन संस्था यांना हस्तांतरित केलेले अनुदान ज्या योजनेकरिता/ प्रयोजना करिता मंजूर करण्यात आलेले आहे, त्याच योजनांवर/ प्रयोजनांवर खर्च करणे बंधंकाराक राहील.

१९) सदर केंद्राच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी दिव्यांग सक्षमीकरण विभाग, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी केंद्र स्थापनाविषयक दिलेल्या सुचनेनुसार / लेखा पद्धतीप्रमाणे या केंद्राचा कार्यभार मा. जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख अध्यक्षतेत करावा

२०) सदर योजनेबाबत मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेत तयार करण्यात येणा-या जिल्हा व्यवस्थापन समितिच्या मंजुरिने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, निकष, तपासनी सूची, अटी-शर्ती कार्यान्वयन संस्था यांना बंधनकारक राहतील

२१) सदर जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या कार्याचा प्रगती अहवाल वेळोवेळी जिल्हा समाज कल्याण विभागाला सादर करणे व अभिलेखासाठी संग्रहित करणे ही जबाबदारी कार्यान्वयन संस्थाची राहील.

२२) उच्च दर्जाच्या कार्याची गुणवत्ता राखण्याची तसेच विविध दिव्यांग कल्याणविषयक योजना यशस्वीरीत्या राबविण्याची, संनियंत्रण याची जबाबदारी ही संबंधित कार्यान्वयन संस्थेची राहील, तसेच या केंद्राच्या सर्व हितसंबंधांची रक्षा करण्याचे उत्तरदायीत्व संस्थेचे राहील.

२३) कार्यान्वयन संस्था यांनी कार्यालयातील सर्व यंत्र सामुग्रीचा उदा. दूर्ध्वनी, टंकलेखन यंत्र, संगणक, फक्स, झेरोक्स मशीन आणि जी यंत्रे काम करण्यासाठी हाताळण्यात येतील, त्यांना काळजीपुर्वक वापर करून सदर यंत्राचे कोणत्याही तर्हेने नुकसान होणार नाही याची काळजी घेण्याची जबाबदारी राहील.

२४) अर्जातील कोणत्याही स्वरुपातील त्रुटी आणि अपूर्ण अर्ज पूर्णपणे नाकारण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांना आहेत तसेच या जाहिरातीची पुढील सर्व कार्यवाही व शुद्धिपत्रे वरील जिल्ह्याच्या वेबसाइटवर उपलब्ध राहतील.

२५) सदर केंद्र स्थापने संबंधित कोणत्याही कलमाबाबत व अन्य कोणत्याही नियमांबाबत विवाद निर्माण झाल्यास मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांचा निर्णय अंतिम राहील, त्याबाबत कोणत्याही प्रकारची

Scanned by CamScanner

तक्रार / सुचनेची दखल घेतली जाणार नाही.

२६) मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी कोणत्याही संस्थेला कोणतीही कारणे न देता जाहिरात निलंबन, रद्द करणे. जाहिरात दुरूस्ती करणे, वाटाघाटी व सुधारित करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.

२७) संस्थानी जाहिरात दिनांका पासून दहा दिवसाच्या आत अर्ज कार्यालयास सादर कराव.

*-Sd-*

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंधाधिकारी
जिल्हा गोंदिया

Scanned by CamScanner